# पाठ : २१

# बनगरवाडी – वाङ्मयीन वैशिष्ट्ये

२१.० उद्दिष्टे
२१.१ प्रास्ताविक
२१.२ वातावरण निर्मिती
२१.२.१ प्रदेशवर्णन
२१.२.२ वाडीकडे जाणारा रस्ता, गाव
२१.३ लोकजीवनाचे चित्रण
२१.४ निवेदनशैली
२१.५ भाषाशैली
२१.६ समारोप
२१.७ सारांश
आपली प्रगती तपासा : उत्तरे
स्वाध्याय

## २१.० उद्दिष्टे

मित्रांनो, प्रस्तुत पाठात आपण आता 'बनगरवाडी' या कादंबरीची वाङ्मयीन वैशिष्ट्ये अभ्यासणार आहोत. आपण एम. ए. च्या अभ्यासक्रमात वेगवेगळ्या साहित्यकृतींचा अभ्यास करत आहोत. हा अभ्यास म्हणजेच ती ती साहित्यकृती निरनिराळ्या पद्धतींनी समजून घेणे होय. 'बनगरवाडी' कादंबरीचे कथानक, तिच्यातील पात्रवैशिष्ट्ये यांच्या सखोल अभ्यासानंतर आता इतर वाङ्मयीन वैशिष्ट्ये अभ्यासायची आहेत. मूळ कादंबरीच्या जोडीने हा पाठ अभ्यासल्यावर तुम्हाला,

- 'बनगरवाडी'तील वातावरणनिर्मिती, प्रदेशरचना आणि निसर्ग यांविषयी लिहिता येईल.
- 'बनगरवाडी'तील लोकजीवनाची माहिती सांगता येईल.
- 'बनगरवाडी'च्या निवेदनशैलीविषयी लिहिता येईल.
- 'बनगरवाडी'च्या भाषाशैलीची वैशिष्ट्ये सांगता येतील.

## २१.१ प्रास्ताविक

'बनगरवाडी' या शीर्षकावरूनच ह्या कादंबरीच्या कथानकाबद्दल, ते कथानक कुठे घडले त्या प्रदेशाबद्दल कल्पना येते. लेखक व्यंकटेश माडगूळकर ज्या प्रदेशात जन्मले, वाढले तो प्रदेश म्हणजे माणदेश हा होय. या माणदेशाला या कादंबरीत एक व्यक्तिमत्त्व प्राप्त झाले आहे. हा प्रदेश या कादंबरीचा एक अविभाज्य असा भाग आहे. या कादंबरीतील घटना घडतात त्या माणदेशातील धनगरांची वस्ती असलेल्या वाडीत. माडगूळे ह्या लेखकाच्या जन्मगावापासून जवळच असलेल्या या वाडीचं नाव लेंगरवाडी होतं. तिला माडगूळकरांनी 'बनगरवाडी' हे नाव दिले. या प्रदेशाबद्दलचे, तेथे राहणाऱ्या लोकांबद्दलचे तपशीलवार वर्णन या कादंबरीत आहे. लेखकाच्या सूक्ष्म निरीक्षणशक्तीचा त्यातून प्रत्यय येतो. या प्रदेशातील जीवननाट्य आणि अनुभव या कादंबरीत जिवंतपणे चित्रित झाले आहेत.

## २१.२ वातावरणनिर्मिती

'बनगरवाडी' ही प्रादेशिक कादंबरी आहे, असे आपण मागील पाठात (क्र.१९) पाहिले. प्रदेशाशिवाय या कांदबरीला 'कादंबरीपण'च प्राप्त होत नाही. कारण माणदेशातल्या या विशिष्ट प्रदेशातील विशिष्ट लोकांचे (धनगरांचे) जीवन हा या कांदबरीचा प्राणभूत असा, अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. ह्या प्रदेशाचे वर्णन लेखकाने अतिशय तपशीलवार केले आहे. त्यामुळे पात्रांइतकेच त्यांचा परिसरही बोलका आणि सजीव झाला आहे.

या वातावरणाची विविध वैशिष्ट्ये आपल्या सांगता येतील.

### २१.२.१ प्रदेशवर्णन

हा प्रदेश मुख्यत: कमी पाऊस पडणारा प्रदेश आहे व त्यामुळे ओसाड असलेला दिसून येतो. जिकडे तिकडे पिवळ्या करड्या रंगांचे भगभगीत माळ दिसून येतात. हे माळ दगडगोट्यांनी भरलेले असतात. पाऊस कमी असल्याने हा प्रदेश हिरव्यागार वनराजीने नटलेला नाही. झुळझुळ वाहणाऱ्या, विशाल पात्र असलेल्या नद्या या प्रदेशात नाहीत. क्वचित कुठे नेपतीबोराटीची झुडपे असतात आणि वाडीला जाणारी वाट दगडगोटे असलेली व धुळीने भरलेली अशी असते. येथील निसर्गाचे वर्णन कादंबरीत असे येते.

१) क्वचित कुठे खोलगट भागांत झाडाझुडपांचे हिरवे ठिपके दिसत होते. (पृ. २)

२) वाटेवरची धूळ पायाला गार लागू लागली. (पृ. १)

३) झाडेझुडपे, दगडगोटे यांना आकार आला. (पृ. १)

४) माळावर वाळून पडलेले गवत सूर्याच्या पहिल्या किरणांनी उबदारले. (पृ. २)

या प्रदेशात आढळून येतात लिंबाची व बाभळीची झाडे. कारण ही झाडे कमी पावसातही वाढतात. उन्हातून लांबवर चालत आलेला नायक लिंबाची सावली पाहून त्या झाडाखाली बसतो. तालमीच्या इमारतीसाठी नायक बाळा बनगराकडे झाड मागायला जातो ते झाड लिंबाचे

असते. अंजीला रानात काम करताना दुसऱ्या गावातील मेंढका भेटतो तो बाभळीचे झाड सावळताना.

मेंढरांना चरायला नेण्याचे कुरण वाडीपासून तीन मैल लांब असते. पाण्याची टंचाई असल्याचं नायक व कारभारी यांच्या संवादातून सूचित होतं. तहानलेला नायक कारभाऱ्याला पाण्याविषयी विचारतो तेव्हा तो उत्तर देतो, ''पाण्याची वरड हाय गा वाडीला. उन्हाळ्यात पार वाळवण हुतं.'' चरायला गेलेल्या मेंढरांना सुकलेला ओढ्याओघळीला असलेले पाणी प्यावे लागते. पिण्याच्या पाण्यासाठी इथे विहिरी खोदलेल्या असतात. तसेच गावात दगडचुन्याने बांधलेला हेळ असतो.

'पाऊस पडतो तेव्हा मात्र सगळीकडे हिरवेगार होते. जिकडे तिकडे गवत उगवते. या गवताचे वर्णन कादंबरीत केले आहे. उदा. 'अंगणात, माळरानावर, छपरांवर जिथे उगवू नये तिथे गवत उगवू लागले. सर्वत्र झगझगीत पोपटी रंग दिसू लागला.'

पाऊस पडल्यावर बारीक बारीक बेडक्या दिसू लागतात. उड्या मारू लागतात. त्याच्यावर कावळे झडपा घालू लागतात. तर पंख असलेले किडे उडू लागतात. त्यांना चिमण्या–कावळे खाऊ लागतात. विटकरी व काळ्या रंगाचे वाणी इकडेतिकडे फिरू लागतात.

नांगरल्या जमिनीतील ढेकळे विरघळतात. जमिनी पाणी पिऊन घेतात. लहानमोठी डबकी साचतात आणि त्यात निळ्याकाळ्या आकाशाचे प्रतिबिंब दिसू लागते. मेंढरांच्या, लोकांच्या पायाला चिखल लागू लागतो. काळे कोतवाल पक्षी घोगरा आवाज काढू लागतात. पावसामुळे सृष्टीत होणाऱ्या बदलाचे वर्णन अशा प्रकारे कादंबरीत येते.

वाडीजवळ रानात ससे, लांडगे, घोरपडी असे प्राणी असतात. लांडगे मेंढराला घेऊन जातात तेव्हा गावातले दहापाच लोक त्यांच्या मागे जातात. पण लांडगा सापडतोच असे नाही. सतासारखा वाडीतला मुलगा लांडग्याला कुऱ्हाडीने मारतो. रामोशी रानातल्या ससा, घोरपडीची शिकार करतात.

चिमण्या, कावळे, बगळे हे सगळीकडे आढळणारे पक्षी माणदेशात दिसतात. पीक तयार झाल्यावर पिकांमधले दाणे खायला हे पक्षी येतात. तसेच काही परदेशी पक्षीही येतात. रामोशी या पाखरांची शिकार करू लागतात.

या प्रदेशातील प्रमुख पीक म्हणजे बाजरी व ज्वारी. त्यासोबत तुरीचे पीकही घेतले जाते. हुलगा, मूग, मटकी अशी कडधान्येही पिकतात. या तयार होणाऱ्या पिकांचे सुंदर वर्णन या कादंबरीत केले आहे. उदा. 'हिरव्या ताटांवर तपकिरी रंगाची कणसे सर्वत्र डुलू लागली आणि लवकरच जांभळ्या फुलोऱ्यांनी फुलून गेली. हुलग्याला जोम आला. तुरीच्या उभार झाडांवर सावळ्या शेंगा दाण्यांनी भरू लागल्या.'

'दरम्यान श्रावणमासी पेरलेली ज्वारी बळावली. काळ्या रानातून ज्वारीची धाटे गुडघ्यामांडीला आली.'

'हरबऱ्याला पोचट घाटे लोबूं लागले. हिरवे बाटूक खाऊन जनावरे गोटीसारखी गोल

गरगरीत झाली.'

बाजरीचे पीक तयार झाल्यावर नंतर ज्वारी, हरबरा ही पिके येतात. बाजरीची नवी कणसे दसऱ्याला सोन्याबरोबर वाटली जातात. ज्वारीचा हुरडा लहानथोर, बायामाणसे सगळेच आवडीने खातात. थंडी पडू लागली की लोक शेकोटी पेटवू लागतात व काळ्या घोंगडीने अंग झाकून घेतात.

एखादे वर्ष या प्रदेशात असे येते की, पाऊस या प्रदेशाला हुलकावणी देऊन निघून जातो. नक्षत्रांमागून नक्षत्रे कोरडी जातात. वाडीवर दुष्काळाचे सावट पडते. अन्नधान्य व पाण्याचे दुर्भिक्ष निर्माण होते. रानातले ओघळ, ओढे आटून जातात. विहिरींचे पाणी आटते. कारण जमिनीतही खोलवर पाणी नसते. गुराढोरांना, मेंढरांना चारा मिळायची मारामार होते. जनावरे रोड होतात. मेंढरांची चरबी वाळून जाते. त्यांच्यात रोगराई पसरते. तर काही गुरांना, मेंढरांना बाजारात नेऊन विकावे लागते. हातावरची पोटे असणाऱ्यांबरोबर घरातले धान्य संपल्यावर सगळ्यांवर उपासमारीची वेळ येते. तेव्हा गावकरी आपली मेंढरे, गुरंढोरं घेऊन 'जगायला' बाहेर पडतात. वाडी ओस पडते. 'बनगरवाडी'तील निसर्ग असा चित्रित झाला आहे.

कादंबरीमध्ये वास्तवाचा प्रत्यय यावा म्हणून कादंबरीतील पात्रे ज्या प्रदेशात वावरतात, त्याचा ठसा वाचकाच्या मनावर उमटावा असा प्रयत्न कादंबरीकार करत असतो. ही पात्रे ज्या प्रदेशात वावरत असतात त्यालाच वातावरण म्हटले जाते. कादंबरीला असणारी स्थलकालाची चौकट, भौगोलिक, सांस्कृतिक परिसर, पात्रे वावरतात ती घरे, रस्ते, आजूबाजूची राने, जंगले हे सर्व वातावरणाचा भाग म्हणून येते.

'बनगरवाडी' ह्या शीर्षकावरूनच 'बनगर' म्हणजे धनगरांची वस्ती असे रूप मनासमोर येते. माणदेशातील माडगूळे ह्या गावाजवळ ही वाडी आहे. नायक ह्या वाडीत एक शिक्षक म्हणून यायला निघतो त्या प्रसंगापासून या कादंबरीची सुरुवात होते. या कादंबरीत येणारा प्रदेश कथानकाचा एक अविभाज्य भाग आहे. कादंबरीत प्रदेश अत्यंत सजीव असा साकारला आहे. कादंबरीचा आशय मनाला भिडेल असा झाला आहे.

### २१.२.२ वाडीकडे जाणारा रस्ता, गाव

दशम्यांची पिशवी पाठीला घेऊन चालतच बनगरवाडीला निघालेल्या नायकाच्या निवेदनातून वाटेचे व उमलणाऱ्या पहाटेचे सुंदर वर्णन येते.

अद्याप सर्व काळोख भरून राहिलेला असतो. चांदण्यांच्या उजेडात गाडीवाट फिक्कट दिसत असते. वेळेचा अंदाज बांधता येत नसतो. रातकिडे किरकिर करत असतात. गार वारा वाहत असतो. बाभळी, तरवट या झुडपांचा वास येत असतो. हळूहळू उजाडू लागते. चांदण्या दिसेनाशा होतात. रातकिड्यांचे गाणे थांबते. झाडेझुडपे, दगडगोटे यांना आकार येऊ लागतो. तांबडापिवळा सूर्य माळा आडून वर येतो. हिरवट प्रकाशाला पिवळट झळाळी येते. पक्षी जागे होतात व त्यांचे सुस्वर कानी येऊ लागतात. कीटकही जागे होऊन उड्या मारू लागतात. खाद्य शोधू लागतात.

सगळीकडे पिवळ्याकरड्या रंगाचे भगभगीत माळ दिसू लागतात. क्वचितच कुठे हिरवी झाडे–झुडपे दिसतात.

नायक गावात शिरतो खरा. पण गाव कसले ते. लेखक लिहितो, ''आजूबाजूला सपाट मोकळा माळ, बाजरीची तांबडी राने, आणि मध्येच गबाळे पडावे तशी पडलेली तीस–पस्तीस घरे, अशी बनगरवाडी होती.'' घरांच्या भिंती मातीच्या होत्या आणि छपरे खपलीच्या काडीने शाकारलेली होती. वाडीत रस्ते असे नव्हतेच. घरे बांधून उरलेली जागा चालण्यासाठी वापरली जात होती.

## २१.३ लोकजीवनाचे चित्रण

बनगरवाडीत बहुतेक वस्ती धनगरांची असते. याशिवाय शेतकरी, रामोशीही वाडीत राहात असतात. या लोकांच्या जगण्याचे, त्यांच्या समजुतींचे, त्यांच्यातील रागलोभ, हेवेदावे, त्यांच्या परंपरा, अंधश्रद्धा या सगळ्याचे बारकावे लेखकाने टिपले आहेत.

हे धनगर रंगाने काळेभोर असतात. दाढी वाढलेली, त्यांचा वेश म्हणजे धोतर, वर सदरा वगैरे काही नाही. तो कधीतरी घालायचा. डोक्याला मुंडासे नाहीतर पटका.

यांची वस्ती म्हणजे आजूबाजूला मोकळा माळ व बाजरीची राने आणि मध्येच तीस–पस्तीस घरे. वाडीत रस्ते असे नसतातच. घरे बांधून उरलेली जागा चालण्यासाठी वापरली जात असते. बहुतेक घरे मातीची असतात, काही धाब्याची असतात. प्रत्येक घरापुढे अंगण असते. सांडपाण्यावर वाढलेली शेवग्यासारखी झाडे असतात. घराच्या मागच्या बाजूला मेंढरांसाठी बाभळीच्या काट्यांचे कूड घातलेले वाडे असतात. पाऊस पडला की ही घरे गळू लागत मग घरात जागजागी भांडी ठेवावी लागत.

ह्या धनगरांचे जीवन कष्टमय असते. यांची सकाळ उजाडे तीच मेंढरांच्या गलक्याने. पहाट झाल्यापासून जागे झालेले मेंढके मेंढरांच्या पोरांना मोकळे करून देत असत. वाडा स्वच्छ झाडून लेंड्यांचा ढीग एका ठिकाणी गोळा करीत. पोरांचे दूध पिणे झालेले असले की, त्यांना परत बांधून टाकायचे. धनगरणीने केलेली ऊनऊन भाकरी खाऊन मेंढरांना घेऊन रानात जायचे असा सकाळचा वेळ जात असे. रानात जाताना राखण करण्यासाठी सोबत कुत्रेही असायचे. ऊन तापू लागण्यापूर्वीच मेंढके रानात गेलेले असत.

दुपारी हे विहिरीवर आंघोळी करत. भाकरी खात आणि मग आळीपाळीने थोडी डुलकी घेत. उन्हं उतरू लागली की मेंढरे घेऊन परत घरी येत. घरी असलेल्या धनगरांच्या बायका टाकळीवर सूत काढण्याचे काम करत. मेंढरं घरी आली की चूल पेटवून स्वयंपाकाला लागत. मेंढके मेंढरे जुळण्याचे काम करत. मग भाकरी व कोरड्यास खाऊन अंगावर कांबळे घेऊन हे मेंढके चावडीपाशी जमत. थोड्या पाऊसपाण्याच्या, इकडच्या तिकडच्या गप्पा होऊन घरी येऊन झोपत.

शेतकरी व त्यांच्या बायकाही रानात जात. रामोशी मात्र काही उद्योग करीत नसत.

कोणाकोणाच्या शेतातून काणसं, वांगी अशा चोऱ्या करून तर कधी रानातील एखादा प्राणी मारून यांची गुजराण होई.

या लोकांच्या गरजा फार थोड्या असतात. भाकरी हेच त्यांचं मुख्य अन्न असतं. भाकरीसोबत असली तर भाजी नाहीतर चटणी, कांदा, मिरची असं काहीही त्यांना चालत असे. चावडीसमोर ही मंडळी अंधारातच बसत. त्या काळी गावामध्ये वीज नव्हतीच. पण साध्या दिव्याचीही गरज त्यांना वाटत नसे. करमणूक म्हणून हे मेंढरांच्या गळ्यात घुंगरू बांधून त्याला काठीवरून उड्या मारायला शिकवत. त्याला जरा भाकरीचा तुकडा वगैरे खाऊ घालत.

सुगी संपली की कोल्हाट्याचे, दरवेशाचे, गारूड्याचे खेळ बघत. त्यांना थोडे धान्य देत. ढोल, झांजा, लेझीम घेऊन त्यांचा नाच होत असे. चांदण्या रात्री तरुण पोरे लोंपाट खेळत असत. कोणी लेझीम खेळत तर कोणी पटांगणातले मोठमोठे दगडगोटे नाल उचलून जमिनीवर टाकून आपल्या शक्तीचा अंदाज घेत. वाडीत लग्न सार्वजनिक, सामूहिकरीत्या करत असत. त्यामुळे जेवणाचा खर्च कोणा एकालाच करावा लागत नसे. दरवर्षी एखादा मुहूर्त बघून सगळी लग्न एकाच दिवशी लावण्यात येत. एखादा अडचणीत असला तर सर्व मिळून खर्चाचा बोजा उचलत.

भांडणतंटा झाला तर तो वाडीतच मिटवला जाई. कारभारी, काकूबा अशी वृद्ध मंडळी व मास्तर मिळून न्याय करत. तो मानला जाई. अपील करणे म्हणजे धनगरांच्या महादैवताला बोलावणे आणि सर्वांना जेवण देणे हे करावे लागे. त्यामुळे कुणी अपील करत नसे.

जातिभेद पाळला जात असे. आपापल्या जातीतच लग्न होत. पुरुष दुसरं लग्न करू शकत असे. दुसऱ्या जातीतील विधवा बाई पळवून आणलेली चालत नाही. दोघांनाही जबर शिक्षा असते. हे जीवन्या रामोश्याच्या प्रकरणावरून लक्षात येते. एखाद्याला नवीन मेंढर करायची असली तर ती विकत घ्यावी लागत नसत. खोबऱ्याची वाटी व त्यावर भंडारा घालून मेंढक्याकडे जाऊन त्याला द्यायची व सांगायचं 'मी बेणं करतोय'. मग तो मेंढका एकदोन मेंढरे याला फुकट देतो. दहापाच मेंढरे जमवून सुरुवात होत असे. मात्र बियाणे म्हणून आणलेली मेंढरे विकायची नाहीत, कापायची नाहीत. असा त्यांच्या नियम असतो व तो ते पाळतात.

त्यांच्यात समजुती, श्रद्धा, अंधश्रद्धा असतात. भानामती, देवऋषी, देवी अंगात येणे इत्यादींवर विश्वास असतो. परंपरेने चालत आलेल्या समजुती असतात. उदा. लांडग्याने मेंढरू नेलं तर मेंढरांना साथीचा रोग होत नाही.

शिक्षण, शाळा यांचे महत्त्व नसते. या वाडीतील माणसे स्थितिशील असतात. पोरं जास्त शिकली तर रानात मेंढरांमागे जाणार नाहीत म्हणून शिक्षणाला विरोध असतो. 'ठेविले अनंते तैसेची राहावे' अशी वृत्ती असते. बाहेरच्या जगाचे ज्ञान नसते व ते नाही याची जाणीवही नसते.

तरी एकंदरीत ही माणसे साधी, एकमार्गी असतात. रागलोभ, द्वेष या भावना असल्या तरी त्या टोकाच्या नसतात. दादू बालट्यासारख्या एखाद्या माणसाला शिक्षा केली तरी कारभाऱ्यासारखा माणूस त्याला माफ करतो. दुसऱ्या बाईच्या नादी लागलेल्या नवऱ्याबरोबर शेकूची बायको पुन्हा संसार करू लागते. कारभाऱ्यासारखा वृद्ध शांतपणे व समाधानाने

मरणाला सामोरा जातो.

या लोकजीवनातील ही वैशिष्ट्ये त्यातील तपशील हे कथानकाच्या ओघात आलेले आहेत हे विशेष. हा प्रदेश, ह्यातील माणसे सजीवपणे डोळ्यासमोर साकारू लागतात.

ह्या कादंबरीत पानोपानी माडगूळकरांनी केलेली रेखाटने आहेत. ही वाडीतल्या माणसांची, बायकांची आहेत, तशीच चरणाऱ्या मेंढरांची, धनगरांच्या झोपड्यांची, घरांपुढील कोंबड्यांची आहेत. त्याने ह्या कांदबरीला, प्रदेशाला अधिक जिवंतपणा आला आहे.

**२१.३ आपली प्रगती तपासा :**

१) 'बनगरवाडी' ही .............. कादंबरी आहे.

२) या प्रदेशात .............. व .............. झाडे आढळून येते.

३) अंजीला .............. झाड सावळताना मेंढका भेटतो.

४) या प्रदेशातील प्रमुख पिकं म्हणजे .............. व ..............

५) बनगरवाडीतील घराच्या भिंती .............. होत्या.

६) धनगरांचे जीवन .............. असते.

७) धनगरांच्या बायका .............. सूत काढत.

८) .............. मात्र काहीही उद्योग करीत नसत.

९) भांडणतंटा झाला तर .............. मिरवला जाई.

१०) कारभाऱ्यासारखा वृद्ध .............. व .............. मरणाला सामोरा जातो.

## २१.४ निवेदनशैली

निवेदन हा कादंबरीचा महत्त्वाचा घटक आहे. कादंबरी हा खूप मोठा काळ व अवकाश व्यापणारा कथात्म साहित्यप्रकार आहे. त्यामुळे कादंबरीत पात्रेही अनेक असतात. कांदबरीतल्या आशयाला नेमके पेलण्यासाठी प्रस्तुतीकरणाच्या अनेक पद्धती वापराव्या लागतात. निवेदन, वर्णन, संभाषण, भाष्य ह्या प्रस्तुतीकरणाच्या पद्धती आहेत. तसेच दैनंदिनी, पत्रे इत्यादी माध्यमे आहेत. कांदबरीकार गरजेनुसार या सर्व पद्धतींचा वापर करतो.

निवेदनाच्या दोन पद्धती आहेत.

**१) प्रथमपुरुषी निवेदन –** प्रथमपुरुषी निवेदन हे कादंबरीतील एका पात्राने केलेले असते. उदा. 'पण लक्षात कोण घेतो'मध्ये 'यमू' या स्त्रीपात्राद्वारे केलेले निवेदन किंवा

'भंगलेले देऊळ'मधील अनु या पात्राद्वारे केलेले निवेदन हा एक प्रकारे आत्माविष्कार असतो. या निवेदनामुळे आपली स्वत:ची जीवनदृष्टी व्यक्त करण्याची संधी लेखकाला लाभते.

**२) तृतीयपुरुषी निवेदन –** या प्रकारच्या निवेदनातील निवेदक हा सर्वसाक्षी असतो. पात्रांपासून अलग राहून त्यांच्या हालचालींचे, क्रियांचे, लकबींचे तो वर्णन करतो. तसेच पात्रांच्या मनोव्यापारांशी, मानसिक संवेदनांशी तो समरस होतो. बहुसंख्य कादंबऱ्या या पद्धतीने लिहिलेल्या असतात.

ह्या कादंबरीतील निवेदन प्रथमपुरुषी आहे. वाडीत शाळामास्तर म्हणून आलेल्या नायकाच्या तोंडून व त्याच्या दृष्टिकोनातून कथानक उलगडत गेलेले आहे. असे असले तरी निवेदक म्हणून या कादंबरीत काही वर्णनांमध्ये लेखकाचे अस्तित्व जाणवते.

पृ. २०, २१, २२ वरील धनगरांची दिनचर्या, पृ. ३५ ते ३६ वरील पावसाचे वर्णन, पृ. ६३, ६५ वरील सनाची हकीकत, पृ. १०२ ते १०८ वरील जगन्याची पाठलागाची व त्याला पकडून दिल्याची हकीकत यांमध्ये निवेदकाने केलेली वर्णने आहेत.

निवेदन नागरी भाषेत असले तरी बोलीभाषेतील काही शब्द निवेदनात आल्याने भाषेला एक वेगळाच बाज प्राप्त झाला आहे.

उदा. 'उबदारले', 'हरेक', 'ध्यानी आले नाही', 'माळावरच्या बिळांतून घोरपडींनी मुंडकी बाहेर काढली.', 'बाहेर चांद उगवला होता', 'जीव धाकधुक करणे', 'कणसे खुडून ती चारी, हेळ' इ.

निवेदनाबरोबरच लेखकाचं भाष्यही कादंबरीत काही ठिकाणी आलं आहे. जे लेखकाचे विचार व्यक्त करतात.

१) 'मुले शाळेत आली तर त्यांना पोटाला कुणी घालावे, कसे हा प्रश्न मला कधी जाणवला नव्हता. लहान मुलांना आईबाप मिळवून खाऊ घालतात, अशी माझी समजूत होती.'

२) 'पण मला राहून राहून वाटले की 'ग–म–भ–न' लिहायला शिकविणे एवढेच आपण करतो, पण यांची गरज वेगळी आहे.'

३) 'एक वेळ पाणी पडले नाही, एक पावसाळा दिसला नाही, आणि वाडी खलास झाली.'

लेखकाचे निवेदनकौशल्य समजून घेण्यासाठी पुढील वर्णने बारकाईने वाचा.

'पश्चिमेकडे तांबडेभडक झाले होते. पूर्वेकडे वारा वाहात होता. पांढऱ्या ढगांचे लहानलहान पुंजके तांबड्या पश्चिमेकडून निळ्याकाळ्या पूर्वेकडे पसरले होते. जमिनीप्रमाणे आभाळातही पांढरी मेंढरे वाडग्याकडे चालली होती!' (पृ.११)

'सकाळची कोवळी उन्हे निबर होण्याअगोदर मेंढरांचे वाडगे मोकळे होत. दूरची राने तुडवित मेंढरे घेऊन जात. ही मेंढरे गेली की, वाडीतले चैतन्य गेल्यासारखे होई. मग शेतकरी होते ते गुरेढोरे घेऊन रानात जात. लहान पोरे शेरडांमागे जात. बायाबापड्या तान्ही पोरे काखेला मारून, डाल पाटीत घालून रानात कामाला जात. त्यांच्या मागोमाग पाळीव कुत्री

जात. दुपार होई तेव्हा रहाटावर लोकर कातणाऱ्या बायकांवाचून वाडीत कोणीही दिसत नसे.' (पृ.२३)

या वर्णनातून लेखकाने काही खूप अलंकृत भाषा वापरलेली नाही, की कल्पनारम्यतेचा विलास दाखवलेला नाही. पण 'ढगांना मेंढरे' म्हणण्यातून 'उन्हे निबर'झाली अशी शब्दयोजना करण्यामधून लेखक आपल्या विषयाशी किती एकरूप झाला आहे, ते समजते! (अशा प्रकारची अनेक उदाहरणे तुम्हालाही सापडतील. त्यांची नोंद करा.)

सुगीच्या दिवसांतले वातावरण, दुष्काळ पडल्यावरची परिस्थिती यांची वर्णने चित्रदर्शी आहेत.

निवेदनात 'संवाद' हाही महत्त्वाचा घटक असतो. लेखकाने जे संवाद रंगवले आहेत त्यामधून त्या त्या पात्रांचे स्वभावही व्यक्त होतात. उदा.

आनंदा रामोशी आणि शेतकरी यांच्यातील पुढील संवाद पाहा.

'का पाटील, तुमच्या रानातली वांगी कुणी तोडली का तुमच्या माघारी, ह्या आठपंधरा दिसांत?'

'होय रं आनंदा, कोन चोरटा सोकलाय कुनास ठावं, वटाभर वांगी नेली बग माजी!'

'असं? मीच नेली वांगी.'

'लेका, वर आणखी सांगतोयास. बिनअब्रूच्या!'

'कबूल केल्यावर चोरीचा डाग जातो मालक....' (पृ. २७)

या संवादातून आनंदाच्या स्वभावावर व वृत्तीवर प्रकाश पडतो. (अशासारखी संवादाची उदाहरणं शोधून काढा.)

## २१.५ भाषाशैली

मित्रांनो, आपण हे पाहिले की माडगूळकरांच्या लेखनातील विश्व हे ग्रामीण विश्व आहे. विशेषत: माणदेशचा परिसर त्यांनी आपल्या शब्दाशब्दांतून जिवंत उभा केला आहे. कादंबरीतील पात्रे, वातावरण हे सारे त्यांच्या भाषेतून सजीव झालेले दिसते.

भाषा हा कांदबरीचा एक महत्त्वाचा घटक आहे. कादंबरी ही लेखकाची निर्मिती असते. ती एक कलाकृती असते. लेखक तिथे भाषेचा सहेतुक वापर करतो. अर्थात असा वापर करताना कादंबरीकाराने जे विशिष्ट विश्व कल्पिले आहे, त्या विश्वाची, त्यात वावरणाऱ्या माणसांची जी संस्कृती आहे, तिला अनुरूप अशी भाषा वापरावी अशी अपेक्षा असते.

ह्या कादंबरीत व्यंकटेश माडगूळकर ह्यांनी नागरी व बोली अशा दोन्ही भाषांचा वापर केला आहे. निवेदनासाठी नागरी व संवादांसाठी माणदेशातील बोलीभाषेचा वापर केला आहे. जर निवेदन बोली भाषेत केले असते तर शहरी वाचकांचा भाषा समजायला कठीण गेली

असती व कादंबरी जास्तीत जास्त वाचकांपर्यंत पोचली नसती. संवाद नागरी भाषेत लिहिले असते तर पात्रे कृत्रिम वाटली असती. भाषेचा हा समतोल माडगूळकर यांनी व्यवस्थितपणे सांभाळला आहे. संवादामध्ये नायक सुशिक्षित असल्याने त्याची भाषा शुद्ध व शहरी आहे. उदा. ''पाणी कुठंय ते सांगा, म्हणजे जेवण करीन. भाकरी आणल्यात बरोबर.''

''मला तुमच्याशी थोडं बोलायचं होतं बाबा. एक जरुरीची गोष्ट सांगायची होती.''

वाडीतील इतर लोक बोलीभाषेत बोलतात.

उदा. ''एकलेच हाय का मास्तर?''

''मोजून बगा, ती तीन रुपये धा आने खाऊन बसलोय. ते काय माघारी देनार न्हाई पर बाकी तुमचं सगळं रुपयं तसचं हायेत.''

पंतसरकारच्या तोंडीही नागरी भाषा आहे. बोलीभाषेतील संवादांमध्ये असलेल्या नैसर्गिक गोडव्याने भाषेला वेगळंच सौंदर्य प्राप्त झाले आहे. संवादात बोलीभाषेचा ठसका असून ते चटकदार आहेत. बोलीभाषेच्या वापरामुळे पात्र त्यांच्या सहजरूपात अवतरली आहेत.

माडगूळकरांची शैली ओघवती आणि चित्रमय आहे. वाडी, माणसं, मेंढरं, शेतं यांच्या वर्णनात सूक्ष्म तपशील दिले आहेत. निसर्ग यात सजीवपणे रेखाटला आहे. ऋतूतील बदल, त्यामुळे परिसरातले बदलते वातावरण, वाडीतील लोकांवर त्याचा होणारा परिणाम हे त्यांनी अतिशय सूक्ष्मपणे टिपले आहेत. उदा. 'अगोदर भगभगीत असलेले हे माळ उन्हाळ्यामुळे अधिक भगभगीत दिसत होते.'

'मुरमुट्याच्या बुंध्यावर बसून राहिलेले हिरव्या झगझगीत रंगाचे भुंगे मुरमुटीची तुरट पाने खाऊ लागले.'

'चिमणीचा तांबडा उजेड बालट्याच्या हाडक्या तोंडावर पडला होता. मिशा पिंजारल्या होत्या आणि विडीने काळा पडलेला ओठ त्याने फारोळ्या दातांखाली दाबला होता.'

काडाने शाकारलेली घरे गळू लागली. सुरेख सारवलेली जमीन ठिकठिकाणी ओली होऊन उखणू लागली, तेव्हा धनगरणी चडफडल्या आणि गळणाऱ्या जागी त्यांनी लहानमोठी भांडी ठेवून दिली.

पृ. ३५ ते ३६ वर पावसाने झालेला बदल वर्णन केला आहे. पृ. ५७ ते ६१ वर वाडीतील शेतात तयार होणाऱ्या पिकांचे, कणसे शेतात आल्यावर, त्यातून धान्य कसे काढले जाते, नंतर शेत कसे दिसू लागते वगैरेंचे वर्णन येते. तर पृ. १२० ते १३० दुष्काळाचे, त्यामुळे ओस पडत चाललेल्या वाडीचे वर्णन येते.

उपमांचा वापर करताना लेखकाने त्या प्रदेशाला साजेशा उपमा दिल्या आहेत. त्यामुळे हा परिसर मनावर अधिकच ठसतो. उदा.

१) 'ती गार सावली बघताच, तापलेल्या कोंबड्यासारखा मी तिच्यात बसलो.'

२) 'दूधभात खाऊन मांजर झोपते, तसा आयबू झोपला.'

३) 'त्याचे तेल संपत आल्या दिव्यासारखे डोळे बघितले आणि ती धीराने म्हणाली.'

४) 'वाऱ्याच्या झुळकीवर भुस्सा बाजूला गेला आणि मोत्यासारख्या ज्वारीची रास पडली.' 'जमिनीप्रमाणे आभाळातही पांढरी मेंढरे वाड्याकडे चालली होती.'

ह्या प्रदेशातल्या काही म्हणींचा वापर यात केला आहे.

१) 'धनगरी वेड सहा महिने जाणार नाही!' पृ. ७४

२) 'बोडकीला बावाचा धाक काय रं राम्या?' पृ. ८४

३) 'घर बघावं बांधून!' पृ. ७८

४) 'जनाची न्हाई, मनाची तरी लाज पायजे.'

भीगपाऊस, तिरकसतुंबा, हेळ, भेंडाळलेली इत्यादी काही वेगळे शब्द यांचाही वापर त्या प्रदेशाला जिवंत करतो.

लेखकाच्या भाषाशैलीतून त्याचे निसर्गाशी आणि समाजाशी असणारे अनुबंध नेमकेपणाने प्रकटतात. कारण माडगूळकर कुठेही पाल्हाळ लावत नाहीत. विस्ताराने लिहिणे टाळतात. संयमित आणि नेमकी अभिव्यक्ती ते करतात. प्रमाण आणि बोलीभाषेचा कल्पक व सर्जक वापर ते करतात. ग्रामीण माणसाची, त्याच्या जीवनाची रसरशीत पण आटोपशीर अशी चित्रणे करणारी त्यांची भाषाशैली हे त्यांच्या लेखनाचे बलस्थान आहे.

माडगूळकरांना खरे म्हणजे चित्रकार व्हायचे होते,'करुणाष्टक' कादंबरीत त्यांच्या लहानपणी त्यांनी चित्रकलेच्या परीक्षा दिल्याचा उल्लेख आहे. त्यामुळे रंग, रेषा हे त्यांचे जणू पहिले प्रेम होते. त्यामुळेच कदाचित त्यांची भाषा चित्रमय बनली असावी. या चित्रदर्शी भाषेचा प्रत्यय त्यांच्या सर्वच लेखनातून येतो. 'बनगरवाडी'ही त्याला अपवाद नाही.

**२१.५ आपली प्रगती तपासा :**

**चूक की बरोबर ते सांगा.**

१) निवेदन हा कादंबरीचा महत्त्वाचा घटक आहे.

२) 'बनगरवाडी'चे निवेदन प्रथमपुरुषी आहे.

३) 'बनगरवाडी'ची भाषाशैली ग्रामीण व प्रमाण अशी दोन्ही प्रकारांचे मिश्रण आहे.

४) 'बनगरवाडी'तील संवादांतून पात्रांचे स्वभावदर्शन घडते.

५) माडगूळकरांची भाषा चित्रमय आहे.

## २१.६ समारोप

मित्रांनो, प्रस्तुत पाठातून आपण व्यंकटेश माडगूळकर यांच्या अत्यंत गाजलेल्या,

'बनगरवाडी' या कादंबरीची वाङ्मयीन वैशिष्ट्ये अभ्यासली. 'बनगरवाडी' इतकी लोकप्रिय का झाली असावी, समीक्षकांनीही त्या कांदबरीला श्रेष्ठ कादंबरी का म्हटलं असावं याची कल्पना आपल्याला आता आली असेल. इथे आपला 'बनगरवाडी' या कादंबरीचा अभ्यास 'परीक्षेच्या दृष्टीने' संपला. आता पुढच्या पाठात आपण त्यांच्या नाटकाचा – 'तू वेडा कुंभार' या साहित्यकृतीच्या अभ्यासाला सुरुवात करायची आहे.

## २१.७ सारांश

प्रस्तुत पाठात आपण 'बनगरवाडी' कादंबरीची पुढील वाङ्मयीन वैशिष्टे अभ्यासली.

- वातावरणनिर्मिती, प्रदेशरचना व निसर्ग
- लोकजीवनाचे चित्रण
- 'बनगरवाडी'चे निवेदन प्रथमपुरुषी आहे. त्याची वैशिष्ट्ये.
- लेखकाची ग्रामीण–नागरी भाषाशैली. तिचा नेमकेपणा, तिची चित्रमयता.

## आपली प्रगती तपासा – उत्तरे

**२१.३**

१) प्रादेशिक २) लिंब व बाभळी ३) बाभळीचे ४) ज्वारी व बाजरी

५) मातीच्या ६) कष्टमय ७) टकळीवर ८) रामोशी

९) वाडीतच १०) शांतपणे व समाधानाचे.

**२१.५**

१) बरोबर २) बरोबर ३) बरोबर

४) बरोबर ५) बरोबर

**स्वाध्याय :**

अमोल पालेकर यांनी 'बनगरवाडी' कादंबरीवर याच नावाचा अप्रतिम चित्रपट बनवला आहे. तो पाहा.

***

## अधिक टिपणासाठी

## अधिक टिपणासाठी